# <u>जिल्हा न्यायालय भरती प्रक्रिया —२०२३</u>

## <u>जिल्हा व सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग</u>

## <u>सूचना</u>

जिल्हा न्यायालय भरती प्रक्रिया २०२३ अंतर्गत जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग चे आस्थापनेसाठी ''कनिष्ठ लिपीक'' पदासाठी निवडसूची /प्रतिक्षायादी तयार करणेसाठी ना. उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेल्या सूचीबध्द उमेदवारांची दिनांक ०६/११/२०२४ व १०/११/२०२४ रोजी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखन परीक्षा घेणेत आलेली होती. सदर टंकलेखन परीक्षेद्वारे उमेदवारांनी प्राप्त केलेले गुण तसेच चाळणी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांवर आधारित मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची <u>दिनांक १३/११/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या वेळापत्रकानुसार</u> दिनांक १४/११/२०२४ ते १९/११/२०२४, २१/११/२०२४ व २२/११/२०२४ रोजी <u>जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे मुलाखती घेणेत येणार आहेत.</u>

तरी, मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात भरलेल्या माहीतीस व जाहीरातीत नमुद ''उमेदवारांसाठी सामाईक सूचना'' मधील अ.क्र. ०५(ग) कडील सुचनेस अनुसरुन प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती आणि मुळ प्रमाणपत्रे खाली नमूद केलेल्या दिनांकास व नमूद वेळेत घेवून यावयाची आहेत.

**दिनांक १४/११/२०२४ ते १६/११/२०२४, १८/११/२०२४ ते १९/११/२०२४ व २१/११/२०२४ व २२/११/२०२४** रोजी **दुपारी ०२.०० वाजता** मुलाखत असणा—या उमेदवारांनी सकाळी **<u>११.०० वाजता</u>** व **सायंकाळी ०५.३० वाजता** मुलाखत असणा—या उमेदवारांनी **दुपारी ०२.३० वाजता** तसेच **दिनांक १७/११/२०२४** रोजी मुलाखत असणा—या उमेदवारांनी सकाळी **<u>०९.३० वाजता</u>** जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग येथे उपस्थित रहावे.

मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी तसेच मुलाखती बाबतचे सविस्तर वेळापत्रक जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग चे अधिकृत संकेतस्थळ 'https://sindhudurg.dcourts.gov.in' वर आणि सिंधुदुर्ग जिल्हा न्यायालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द करणेत आलेली आहे. तरी पात्र उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

13/11/2024

जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग.
दिनांक :— १३/११/२०२४.

( हेमंत भ. गायकवाड )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
<u>सिंधुदुर्ग—ओरोस.</u>